<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४७६/२०१६ मध्ये निशाणी क्र. ५३ कडील अर्जावर आदेश.</u>

१) प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादीचा वादीसोबत दावा मिळकतीच्या खरेदीचा कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार ठरला नव्हता. प्रतिवादीचा खरेदीचा व्यवहार हा दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्यासोबत ठरला होता. प्रतिवादीने खरेदीच्या व्यवहारापोटी घेतलेली रक्कम रुपये ३,१३,०००/– ही संपूर्ण रक्कम वादी यांची मुलगी व दत्तात्रय कुलकर्णी यांना परत केली आहे. सदरच्या परत केलेल्या रक्कमेचा उल्लेख प्रतिवादीने त्यांच्या कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये केला आहे. परंतु सदर ठिकाणी सदर रक्कमेबाबतचा खाते क्रमांक व बँकेचे नाव इत्यादीबाबतचा तपशिल नमूद करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार त्यांच्या कैफीयतीमध्ये परिच्छेद क्र. १६ मध्ये सदर प्रतिवादीने वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यावर दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रुपये १,००,०००/– इतकी रक्कम पाठवली असे नजरचुकीने नमूद केले आहे. वास्तविक पाहता त्या दिवशी म्हणजेच दिनांक ०२/०९/२०१६ रोजी प्रतिवादीने सदरची रक्कम ही दत्तात्रय कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादीला दिली आहे.

३) प्रतिवादी हा प्रस्तुत कैफीयत दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादी यांची मुलगी हिच्या खात्यात दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रक्कम रुपये १,००,०००/– जमा केली या मजकूराऐवजी सदर प्रतिवादी यांनी दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादी यांना

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रक्कम रुपये १,००,०००/- दिले आहेत असा मजकूर नमूद करु इच्छीत आहेत. तसेच प्रतिवादी हा प्रस्तुत कैफीयत दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ नंतर परिच्छेद क्र. १६अ समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादीने दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांना व वादीची मुलगी मधुरा अतुल कुलकर्णी यांना जी रक्कम अदा केली आहे त्या रक्कमेच्या बँक खात्याबाबत व बँकेच्या नावाबाबतचा तपशिल समाविष्ट करु इच्छीत आहेत. तसेच प्रतिवादी हा प्रस्तुत कैफीयत दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफीयतीमध्ये परिच्छेद क्र. १८ नंतर परिच्छेद क्र. १८अ समाविष्ट करुन त्यामध्ये वादीचा दावा मुदतीमध्ये नसल्याबाबतचा मजकूर समाविष्ट करु इच्छीत आहे.

४) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या निशाणी क्र. ५६ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून दिशाभूल करणारा आहे. प्रतिवादी याकामी हजर झाला नसल्याने प्रतिवादीविरुद्ध दि. १३/०७/२०१७ रोजी एकतर्फा प्रकरण चालविण्याचा आदेश पारीत झाला होता. त्यानंतर प्रतिवादीने त्यांच्याविरुद्धचा विना कैफीयत प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफीयत स्विकारण्याबाबत अर्ज दिला व तो अर्ज मंजूर झाल्यावर प्रतिवादीने निशाणी क्र. ३५ कडे कैफीयत दिली आहे. त्यानंतर प्रतिवादी कोर्टात हजर राहिला नाही व प्रतिवादीने वादीचा व साक्षीदाराचा उलटतपास घेतला नसल्याने त्याच्याविरुद्ध उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला आहे. त्यानंतर प्रतिवादीचा पुरावा बंदचा आदेश पारीत केल्यावर प्रतिवादीने हा अर्ज दिला आहे. कैफीयत दुरुस्तीच्या अर्जामध्ये कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण नाही व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद

ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) दोन्ही पक्षातील विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या जमीन खरेदीच्या व्यवहाराची रक्कम वसूल करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. ३५ कडे त्यांची लेखी कैफीयत दाखल केली आहे. वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने विचारात घेऊन निशाणी क्र. ३८ कडे वादाचे मुद्दे निश्चित केले आहेत. त्यानंतर वादीने स्वत:ला व एक साक्षीदार तपासला आहे. वादीने त्यांचा पुरावा बंद करत असल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. ४१ कडे दाखल केली आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरीता निश्चित केले असताना व प्रतिवादीने त्यांचा पुरावा दिला नाही म्हणून प्रतिवादीचा पुरावा बंद केल्यानंतर प्रतिवादीने त्यांच्याविरुद्धचा पुरावा बंदचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी निशाणी क्र. ४३ कडे अर्ज दाखल केला आहे व तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरीता निश्चित केले असताना प्रतिवादीने प्रस्तुतचा कैफीयत दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे.

७) प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादीचा वादीसोबत दावा मिळकतीच्या खरेदीचा कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार ठरला नव्हता. प्रतिवादीचा खरेदीचा व्यवहार हा दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्यासोबत ठरला होता. प्रतिवादीने खरेदीच्या व्यवहारापोटी घेतलेली रक्कम रुपये ३,१३,०००/- ही संपूर्ण रक्कम वादी यांची मुलगी व दत्तात्रय कुलकर्णी यांना परत केली आहे. सदरच्या परत केलेल्या रक्कमेचा उल्लेख प्रतिवादीने त्यांच्या कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये केला आहे. परंतु सदर ठिकाणी सदर रक्कमेबाबतचा खाते क्रमांक व बँकेचे नाव इत्यादीबाबतचा तपशिल नमूद

करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. प्रतिवादीच्या सदर कथनांच्या अनुषंगाने प्रतिवादीचे निशाणी क्र. ३५ कडील लेखी कैफीयतीमधील कथनांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादीने त्यांच्या लेखी कैफीयतीमध्ये प्रतिवादीचा वादीसोबत दावा मिळकतीच्या विक्रीचा कोणताही लेखी अथवा तोंडी करार झाला नसल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीने त्यांच्या कैफीयतीमध्ये प्रतिवादी व दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार ठरल्याचे व दावा मिळकतीच्या मोबदल्याच्या रक्कमेपैकी काही रक्कम दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांनी वादी ही त्यांची भावजय असल्यामुळे वादीमार्फत प्रतिवादीला दिल्याचे कथन केले आहे. दत्तात्रय कुलकर्णी यांनी प्रतिवादीला रुपये ३,१३,०००/– इतकी रक्कम दिली होती. त्यानंतर दत्तात्रय कुलकर्णी यांना पैशाची गरज भासल्याने त्यांनी सदर मिळकतीचा व्यवहार रद्द केला व दत्तात्रय कुलकर्णी यांच्याकडून इसारा म्हणून घेतलेली रक्कम दत्तात्रय कुलकर्णी यांना परत केली.

८) प्रतिवादीने त्यांच्या कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीने दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्याकडून इसारात घेतलेल्या रक्कम रुपये ३,१३,०००/– पैकी रुपये १,७३,०००/– ही रक्कम दत्तात्रय कुलकर्णी यांच्या खात्यात दिनांक ३०/०८/२०१६ रोजी जमा केली. प्रतिवादीने त्यांच्या कैफियतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये असे कथन केले आहे की, दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन प्रतिवादीने दिनांक १७/१०/२०१६ रोजी वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यामध्ये रक्कम रुपये ४०,०००/– जमा केली आहे. प्रतिवादी हा प्रस्तुत कैफीयत दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. १६ नंतर परिच्छेद क्र. १६अ समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादीने दिनांक ३०/०८/२०१६ रोजी रुपये १,७३,०००/– ही रक्कम दत्तात्रय कुलकर्णी यांच्या कोणत्या बॅंकेच्या कोणत्या खात्यात जमा केली याबाबतचा तपशिल व

दिनांक १७/१०/२०२६ रोजी प्रतिवादीने वादीची मुलगी मधुरा हिच्या कोणत्या बँकेच्या कोणत्या खात्यात रुपये ४०,०००/– ही रक्कम जमा केली याबाबतचा तपशिल समाविष्ट करु इच्छीत आहेत. प्रतिवादीने यापुर्वीच त्यांच्या कैफीयतीमध्ये दिनांक ३०/०८/२०१६ रोजी प्रतिवादीने दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या खात्यात रुपये १,७३,०००/– इतकी रक्कम जमा केली असल्याबाबत व दिनांक १७/१०/२०१६ रोजी प्रतिवादीने वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यात रुपये ४०,०००/– इतकी रक्कम जमा केली असल्याचे कथन केलेले असल्याने माझ्या मते प्रतिवादीने दत्तात्रय कुलकर्णी व वादीची मुलगी मधुरा यांच्या खाते क्रमांकाबाबतचा व बँकेच्या नावाबाबतचा तपशिल नवीन परिच्छेद क्र. १६अ द्वारे समाविष्ट करण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय आहे.

९) प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार त्यांच्या कैफीयतीमध्ये परिच्छेद क्र. १६ मध्ये सदर प्रतिवादीने वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यावर दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रुपये १,००,०००/– इतकी रक्कम पाठवली असे नजरचुकीने नमूद केले आहे. वास्तविक पाहता त्या दिवशी म्हणजेच दिनांक ०२/०९/२०१६ रोजी प्रतिवादीने सदरची रक्कम ही दत्तात्रय कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादीला दिली आहे. प्रतिवादीच्या सदर कथनाच्या अनुषंगाने प्रतिवादीच्या निशाणी क्र. ३५ कडील कैफीयतीमधील कथनांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादीने कैफीयतीच्या परिच्छेद क्र. १६ मध्ये असे कथन केले आहे की, दत्तात्रय कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन प्रतिवादीने दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रुपये १,००,०००/– इतकी रक्कम वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यात जमा केली. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादीने दिनांक ०२/०९/२०१६ रोजी वादीची मुलगी मधुरा हिच्या खात्यात रुपये १,००,०००/– जमा केलेले नसून प्रतिवादीने ती रक्कम त्या दिवशी वादीला

दिलेली आहे. प्रतिवादीने यापुर्वी त्यांच्या कैफीयतीमध्ये दिनांक ०२/०९/२०१६ रोजी त्यांनी रक्कम रुपये १,००,०००/– अदा केली असल्याबाबतचे कथन केलेले असल्याने माझ्या मते प्रतिवादीने या अर्जामध्ये दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादी यांची मुलगी हिच्या खात्यात दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रक्कम रुपये १,००,०००/– जमा केली या मजकूराऐवजी सदर प्रतिवादी यांनी दत्तात्रय गोपाळकृष्ण कुलकर्णी यांच्या सांगण्यावरुन वादी यांना दिनांक ०२/०९/२०१६ रोजी रक्कम रुपये १,००,०००/– दिले आहेत असा मजकूर नमूद करुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय आहे. प्रतिवादी हा प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांच्या कैफियतीमध्ये या अर्जाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये विनंती केल्याप्रमाणेची करु इच्छीत असलेली प्रस्तावीत दुरूस्ती ही प्रस्तुत दाव्यातील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

१०) प्रतिवादी हा प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफीयतीमध्ये परिच्छेद क्र. १८ नंतर परिच्छेद क्र. १८अ समाविष्ट करुन त्यामध्ये वादीचा दावा मुदतीमध्ये नसल्याबाबतचा मजकूर समाविष्ट करु इच्छीत आहे. प्रतिवादीने त्यांच्या कैफीयतीमध्ये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीचा व्यवहार झाल्याचे नाकारले आहे. तसेच प्रतिवादीने यापुर्वी त्यांच्या कैफीयतीमध्ये दाव्याच्या मुदतीबाबत कोणतीही हरकत उपस्थीत केली नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रतिवादीने प्रस्तुत कैफीयत दुरुस्तीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कैफीयतीमध्ये दाव्याच्या मुदतीबाबत नवीन परिच्छेद क्र. १८अ समाविष्ट करण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमुद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते प्रतिवादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशत: मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीने प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती त्यांच्या कैफियतीमध्ये या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करावी व त्यानंतर दुरुस्त कैफियतीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.03.06 15:14:43 +0530

दिनांकः– ०६/०३/२०२६ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.